# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक.

१.१ संशोधनाची पार्श्वभूमी.

१.२ समस्येची निवड.

१.३ समस्या विधान.

१.४ संशोधनाची गरज व महत्त्व.

१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये.

१.६ संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

१.७ प्रकरणांचे नियोजन.

संदर्भ

# प्रकरण पहिले

## प्रास्ताविक.

### १.१ - संशोधनाची पार्श्वभूमी.

मानव हा समाजशील प्राणी आहे. समाज हा नेहमीच गतीशील असतो. समाजात राजकीय, समाजिक व आर्थिक स्थित्यंतरे, सातत्याने चालू असतात. व्यक्तीच्या जिवनात निर्माण होणाऱ्या विविध समस्यांची सोडवणूक करण्यात शिक्षण नेहमीच प्रभावी ठरले आहे. शिक्षणाच्या माध्यमातून घडून आलेले सामाजिक परिवर्तन हे दूरगामी स्वरूपाचे असते. कोणत्याही देशाची खरी प्रगती अथवा वाटचाल त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टीकोनातून स्पष्ट होते. म्हणूनच शिक्षणावरती होणाऱ्या खर्चास खर्च न मानता देशाची गुंतवणूक मानतात.

माध्यमिक शिक्षण हा प्राथमिक शिक्षण आणि विद्यापीठीय शिक्षण यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. या वयोगटातील विद्यार्थीदेखील मानसशास्त्रीयदृष्ट्या महत्त्वाच्या वयोगटात मोडतात. माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण असायला हवे. माध्यमिक शिक्षणाच्या वाटचालिचा अभ्यास आपणांस स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर अशा दोन विभागात करणे सोयीचे ठरेल.

**स्वातंत्र्यपूर्व कालखंड -** स्वातंत्र्यपूर्व काळखंडात ब्रिटिश सरकारचे माध्यमिक शिक्षणाबाबतचे धोरण उदासिनतेचे होते. माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सरकारने स्वतःकडे न घेता राजे, जमिनदार, श्रीमंत लोक यांनी उदारहस्ते शिक्षणास मदत करून शिक्षण चालवावे या उद्देशाने सन १८४० मध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' ची स्थापना केली. सरकारच्या या सूचनेनुसार भारतात काही खाजगी शिक्षण संस्था सुरू झाल्या. जरी शिक्षणाचा संपूर्ण खर्च या संस्था करीत असल्या तरी अशा संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या शाळांवर शासनाचे संपूर्ण नियंत्रण असे. पुढे सन १८५४ च्या वुडच्या खलीत्यात सुचविलेल्या शिफारशीनुसार माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम, कालमर्यादा व व्याप्ती ठरविण्याचा अधिकार विद्यापिठांना देण्यात आला.

सन १८६६ मध्ये अलेक्झांडर ग्रँटच्या शिफारशीनुसार नवीन अनुदान संहिता अस्तित्वात आली. शाळेच्या निकालावर अवलंबून असलेले 'ग्रँट इन ऐड कोड' अस्तित्वात आले. सन १८७०-१८७१ पासून अध्यापकांचे वेतन, शाळा इमारत बांधकाम इ. बाबींसाठीही शासनाकडून अनुदान मिळू लागले.

सन १८८२ मध्ये नेमलेल्या हंटर कमिशनने माध्यमिक शिक्षणाबाबत महत्त्वाच्या शिफारशी केल्या. त्यात माध्यामिक शिक्षणात विभिन्न अभ्यासक्रमाची सोय असावी व सरकारने माध्यमिक शाळा चालविण्याची जबाबदारी स्वतःकडे न घेता त्यासाठी अनुदान द्यावे या महत्त्वाच्या शिफारशींचा समावेश होता.

सन १९३४ ची सप्रू समिती ही भारताच्या माध्यमिक शिक्षणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. माध्यमिक स्तरावर विविध अभ्यासक्रमाची सोय करून ते वेगवेगळ्या प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या गरजाशी निगडीत केल्यास माध्यमिक शिक्षण स्वयंपूर्ण होवू शकेल असे मत या समितीने मांडले.

**स्वातंत्र्योत्तर कालखंड -** स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेल्या माध्यमिक शिक्षणाच्या प्रगतीचे खरे श्रेय हे मुदलीयार आयोगास जाते. म्हणून सन १९५२ हे साल माध्यमिक शिक्षणाच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे आहे. या आयोगाने माध्यमिक शिक्षणाचा सर्वंकष विचार केला. माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये, अभ्यासक्रम, आकृतीबंध, विविध प्रकारचे माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा परस्पर संबंध इत्यादी बाबी या आयोगाने सविस्तर विशद केल्या.

सन १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व विभागासाठी १९ जून १९६३ रोजी शालेय नियमावलीचे एकसूत्रीकरण करण्यात आले. नंतर शासनाने वेळोवळी या संहितेतील नियमात सुधारणा करणारे आदेश काढले व १० + २ + ३ हा आकृतीबंध राज्यशासनाने स्वीकारला. यातील ८,९,१० या वर्गास माध्यमिक वर्ग संबोधण्यात येते. राज्यशासनाने देखिल प्राथनिक शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे घेतली, ते सक्तीचे व सार्वत्रिक केले तर माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी स्वतःकडे न घेता ती समाजातील स्वयंसेवी संस्थावर सोपविली. राज्यात शासनामार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांचे प्रमाण अत्यल्प आहे.

स्वयंसेवी संस्थेद्वारे चालविल्या जाणाऱ्या शाळांना देखील 'सेकंडरी स्कूल कोड' नुसार कार्य करणे बंधनकारक असल्याने शासनाने अशा शाळांच्या मान्यतेची, तपास्णीची व मुल्यमापणाची जबाबदारी स्वतःकडे ठेवली आहे.

अशा प्रकारे माध्यमिक शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असल्याने या पातळीवरील शिक्षणावर संशोधन होणे गरजेचे आहे. माध्यमिक शिक्षणाचे महत्त्व जाणून घेवून त्यांच्या काही समस्या असल्यास त्यावर सर्वांगीण उपाय सुचविणे गरजेचे आहे. त्यासाठी माध्यमिक शिक्षणाची रचना समजून घेणे महत्त्वाचे आहे.

## १.०२ - समस्येची निवड.

माध्यमिक शिक्षण हा शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे. संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत ज्या शिक्षणाच्या उंबरठ्यावर विद्यार्थ्यांचे भविष्य अवलंबून असते असे शिक्षण म्हणजे माध्यमिक शिक्षण होय. या अवस्थेत विद्यार्थ्यांच्या बौध्दिक बदलाबरोबरच प्रंचड शारीरिक, मानसिक बदलही घूडन येत असतात. म्हणूनच या पातळीवरील अभ्यासक्रमात सामान्य, तांत्रिक, औद्योगिक, कृषी, वाणिज्य इ. घटकांचा समावेश आहे.

सदरील घटकांची माहिती क्रमिक पुस्तकांच्या माध्यमातून आणि मान्यता प्राप्त शिक्षणसंस्थेमधून व्यवस्थीतपणे चालविण्याचे काम त्या त्या जिल्ह्यात जि.प. चा शिक्षण विभाग शासनाच्या अधिपत्याखाली राहून करतो. वास्तविक पाहता क्रमिक पुस्तक संपविणे, परिक्षा घेणे, विद्यार्थ्यांनी चांगले गुण संपादन करणे या बाबी शिक्षण प्रक्रियेत अभिप्रेत नसून त्या प्रक्रियेचा एक भाग आहेत. शिक्षणाची मूळ उद्दिष्टे यापेक्षा खूप वेगळी आहेत.

**माध्यमिक शिक्षणाची उद्दिष्ट्ये :-**

मुदलीयार आयोगाने (माध्यमिक शिक्षण आयोगाने) माध्यमिक शिक्षणाची खालील उद्दिष्ट्ये सुचविलेली आहेत.

१. लोकतंत्रात्मक नागरिकतेचा विकास.
२. व्यावसायिक कुशलतेमध्ये सुधारणा.
३. व्यक्तीमत्वाचा विकास.
४. नेतृत्व गुणाचा विकास.
५. जिवनाच्या कलेचा विकास.
६. खऱ्या देशप्रेमाच्या भावनेचा विकास.

भारतीय शिक्षण आयोगाने (कोठारी आयोगाने) माध्यमिक शिक्षणाची खालील उद्दिष्ट्ये सांगीतलेली आहेत.

१. उत्पादन वृध्दी.
२. सामाजिक एकता प्राप्ती.
३. आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेला गतिमान करणे.
४. सामाजिक आणि आध्यात्मिक मूल्य निर्माण करणे.

५. आर्थिक विकासासाठी मौल्यवान मानवशक्ती प्रदान करणे.

६. लोकशाही संघटीत करणे.

७. भाषा निर्मितीचा विकास करणे.

वास्तविक पाहता या उद्दिष्टाप्रत जाण्यासाठी कांही प्रयत्न केले जातात का याच्या अभ्यासाची गरज आहे.

सद्यपरिस्थित माध्यमिक शिक्षणाचा विचार करता असे लक्षात येईल की, माध्यमिक शिक्षणाच्या उद्दिष्टपूर्तीऐवजी शैक्षणिक गुणवत्ता, मेरीट या बाबींवरतीच शाळा अधिक लक्ष केंद्रित करतात. म्हणून उद्दिष्ट गाठण्यासाठी प्रशासकास कोणत्या अडचणी येतात. त्या जाणून घेणे हा प्रस्तुत संशोधनाचा एक हेतू आहे.

संशोधक हा लातूर शहरात कनिष्ठ महाविद्यालयात इंग्रजी विषयाचे अध्यापण करत असल्याने व उच्च माध्यनिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्याये यांना जिल्हा पातळीवर स्वतंत्र प्रशासक नसून तो कार्यभार जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे असल्याने संशोधकाचा जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंध येतो. यातूनच जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासनात सुसूत्रता, ताळतंत्र नसल्याचे संशोधकाच्या लक्षात आले. म्हणून संबंधित प्रशासकाच्या नेमक्या कोणत्या समस्या आहेत हे जाणून घेणे हे संशोधनाचे कार्य असल्याचे जाणवल्याने प्रस्तुत विषय संशोधन कार्यासाठी निश्चित करण्यात आला.

**१.३ समस्या विधान.**

समस्या विधान खालील प्रमाण आहे.

“लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकीय समस्यांचा अभ्यास.”

संशोधन म्हणजे एखाद्या विषयाचा शास्त्रशुध्द अभ्यास होय. असा शास्त्रशुध्द अभ्यास करताना समस्या विधानातील संज्ञा स्पष्ट अर्थाने नमुद कराव्या लागतात. म्हणून प्रस्तुत समस्या विधानात वापरण्यात आलेल्या संज्ञेचा संशोधन कार्यात अभिप्रेत असलेला अर्थ खालील प्रमाणे संबोधण्यात येईल.

**लातूर जिल्हा.**

**लातूर जिल्हा निर्मिती :-**

उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून दि. १६-८-१९८२ रोजी लातूर या नवीन

जिल्हाची निर्मिती करण्यात आली. या नवनिर्मित लातूर जिल्ह्यात पूर्वीच्या उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा व औसा अशा पाच तालुक्यांचा आणि बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई तालुक्यातील रेणापूर सर्कलमधील रेणापूरसह ४३ गावांचा समावेश करण्यात आला. १५ ऑगस्ट १९९२ रोजी पूर्वीच्या तालुक्याची पुनर्रचना करण्यात येऊन रेणापूर व चाकूर हे दोन तहसील अस्तीत्वात आले. तसेच २३ जून १९९९ रोजी पूर्वीच्या तालुक्याची पुनर्रचना करण्यात येऊन देवणी, जळकोट व शिरूर अनंतपाळ हे तीन तहसील अस्तीत्वात आले. सध्या लातूर जिल्ह्यात लातूर, अहमदपूर, उदगीर, निलंगा, औसा, रेणापूर, चाकूर, देवणी, जळकोट व शिरूर अनंतपाळ असे दहा तालुके आहेत.

**लातूर जिल्हा - भौगोलिक स्थान :-**

लातूर जिल्हा महाराष्ट्र राज्याच्या दक्षिण पूर्वेस (आग्नेय) असून उत्तर अंक्षास १८.५ ते १८.७ व पूर्व रेखांश ७३.२५ ते ७७.२५ अंशामध्ये वसलेला आहे. हा जिल्हा महाराष्ट्र व कर्नाटक राज्याच्या सरहद्दीवर आहे. लातूर जिल्ह्याच्या पश्चिमेला व दक्षिणेला उस्मानाबाद जिल्हा आहे. वायव्य व उत्तरेस परभणी, इशान्येस नांदेड व पूर्वेस कर्नाटकातील बिदर जिल्हा आहे.

## माध्यमिक शिक्षण.

माध्यमिक शिक्षण ही एक शिक्षणप्रणालीची अवस्था आहे. माध्यमिक शिक्षणाचा अर्थ खालील प्रमाणे सांगण्यात आलेला आहे.

**१. माध्यमिक शिक्षण आयोग :-**

"माध्यमिक शिक्षण कोणत्याही प्रकारचे शिक्षण नाही तर शाळेच्या शिक्षणाची ती एक अवस्था आहे."

(Secondary Education is not a type of Education It is a Stage of School Education : Secondary Education Commission)

**२. बंगाल माध्यमिक शिक्षण अधिनिमय १९६० :-**

"माध्यमिक शिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या आवश्यकतांना पूर्ण करणारे शिक्षण होय. यात सामान्य, तांत्रिक, औद्योगिक, कृषी, वाणिज्य यासंबंधीचे शिक्षण संमिलीत आहे."

(Secondary Education Means Education Suitable to the requirement of all Pupils who have Completed Primary Education and Includes general, Technical, Industrial and Agricultural Education : Bangal Middle Education Law - 1960)

**३. रेना रॉय :-**

"प्राथमिक शिक्षण आणि विद्यापीठीय शिक्षण यांना जोडणारा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण होय."

**प्रशासन / प्रशासक.**

या संशोधन कार्यात वापरण्यात आलेला प्रशासकीय हा शब्द केवळ जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी आणि लातूर जिल्हातील मान्यता प्राप्त माध्यम्कि शाळांचे मुख्याध्यापक यांच्या प्रशासनापुरताच मर्यादित आहे.

"शैक्षणिक कृती, योजना, कार्यक्रम व सवलतीच्या बाबतीत मार्गदर्शन करणारी व दीर्घकालीन आणि व्यापक संदर्भात नेतृत्त्व पुरविगारी सामाजिक निती म्हणजे शैक्षणिक प्रशासन होय."

एकंदरीत शैक्षणिक प्रशासनात खालील घटकांचा अंतर्भाव होतो.

१. शैक्षणिक नियोजन.
२. प्रशासनातील मानवी संबंध आणि सहकार्य.
३. प्रशासनाचे विकेंद्रीकरण.
४. वित्त व्यवस्था.
५. प्रशासक, शिक्षक, कर्मचारी यांचे प्रशिक्षण.
६. महत्त्वाच्या समित्यांची तरतूद.
७. संशोधनास आवश्यक बाबींची तरतूद.
८. परिणामाचे मूल्यमापन.
९. समाज - संस्था संबंध.
१०. संस्थेतील व समाजातील निरनिराळ्या घटकांना प्रेरणा देणे. उत्तेजीत करणे व कार्यप्रवण करणे.

११. शैक्षणिक नियोजनास प्रसिध्दी देणे.

१२. बदलत्या सामाजिक परिस्थितीचे भान ठेवून भविष्याचे अंदाज बांधणे.

या बाबींची पूर्तता करत असतांना प्रशासकास येणाऱ्या समस्यांना प्रशासकीय समस्या असे संबोधन्यात आले आहे.

**अभ्यास.**

विविध संशोधन साधनांच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण, स्पष्टीकरण करून माध्यमिक शिक्षणाच्या प्रशासनामध्ये सुधारणा होण्यासाठी मार्गदर्शक सूचनांचा अविष्कार करणे हा याचा अर्थ आहे.

**१.४ संशोधनाची गरज व महत्त्व.**

माध्यमिक शिक्षण हा प्राथमिक व विद्यापीठीय शिक्षणास जोडणारा दुवा आहे. या पातळीवर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास अभिप्रेत आहे. मानसशास्त्रीयदृष्ट्या देखील या काळखंडात विद्यार्थ्यांत आमुलाग्र बदल घडून येतात. या काळखंडात विद्यार्थ्यांचा पाया कितपत पक्का हातो याचेवरतीच विद्यापीठीय शिक्षण अथवा व्यावसाय शिक्षणाची इमारत उभी राहते. म्हणूनच हे शिक्षण राबविणारे प्रशासक योग्य असले पाहिजेत.

असे असताना देखील महाराष्ट्र राज्यात माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी ही शासनाने स्वीकारलेली नाही. माध्यमिक शिक्षण देण्याचे कार्य बहुतांशी स्वयंसेवी संस्थाद्वारे चालविले जाते. अशा संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांना शासन अनुदान देत असल्याने शासनाने ठरवून दिलेल्या नियम व अटींचे पालन या संस्थाना करणे बंधनकारक आहे. या शाळा माध्यमिक शाळा संहितेनुसार चालतात की नाही हे पाहणे, त्याच्या अडचणी सोडविणे, मार्गदर्शन करणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांच्या बाबतीत योग्य ती कार्यवाही करणे अथवा कार्यवाही प्रस्तावित करणे यासाठी शासनाने कांही अधिकारी नियुक्त केलेले आहेत.

जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदे अंतर्गत असणारा शिक्षण विभाग हा जिल्ह्यातील शिक्षणाचा मुख्य केंद्रबिंदू आहे. याची विभागणी प्राथमिक शिक्षण विभाग, माध्यमिक शिक्षण विभाग आणि प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग या तीन विभागात केलेली असून प्रत्येक विभागासाठी शासनाकडून स्वतंत्र शिक्षणाधिकारी प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात येतो.

त्यांच्या मदतीस उपशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी कार्यरत असतात. प्राथमिक शिक्षण सक्तीचे असल्याने व त्याची जबाबदारी शासनावरती असल्याने तालुका पातळीवर पंचायत समिती अंतर्गत गट शिक्षणाधिकाऱ्यां मार्फत शिक्षण विभाग कार्यरत आहे. प्रत्येक गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या मदतीला विस्ताराधिकारी असतात. माध्यमिक शिक्षणाबाबतची काहीअंशी जबाबदारी गटाशिक्षणाधिकारी यांची आहे. म्हणून माध्यमिक शाळांचा पंचायत समितीच्या शिक्षण विभागाशी संबंध येतो. जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग हेच जिल्ह्यातील माध्यमिक शाळांचे प्रशासकीय केंद्र असते.

शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या पदमान्यता, शालेय तपासणी, अनुदान शिफारस, कार्यवाही, शिक्षेस पात्र असणाऱ्या शाळा, संस्था, कर्मचारी यांचेवर कार्यवाही, आदर्श शिक्षकांना जिल्हा पुरस्कार देणे अथवा राज्य पुरस्कारसाठी प्रस्तावित करणे अशी कामे या कार्यालयातून चालतात.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हापातळीवर वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन केले जाते. त्याचबरोबर विद्यार्थ्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन विकसीत करण्यासाठी जिल्हा पातळीवर विज्ञान प्रदर्शने आयोजित केली जातात. यातील निवडक मुलांना राज्य पातळीवर पाठवण्यात येते.

अशा अनेक जबाबदाऱ्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकाऱ्यांना एकाच वेळी मोठ्या कुशलतेने पार पाडाव्या लागतात. हे सर्व करत असताना कर्मचारी भरती नियनानुसार आहे की नाही याचीही पडताळणी करावी लागते. बऱ्याच वेळी शासनाने ठरवून दिलेले नियम बाजूला सारून अनेक शाळांमधून नियमबाह्य कर्मचारी नियुक्त केले जातात. अथवा शिक्षण संस्था ही नफा कमावण्याचे साधन आहे, असे गृहीत धरून संस्थाचालक कर्मचाऱ्यांना ऐरणीवर धतरता. अशा तक्रारी शिक्षणाधिकाऱ्यास प्राप्त झाल्यास त्यांना संबंधित प्रकरणी योग्य तो मार्ग काढावा लागतो अन्यथा प्रकरण न्यायालयात जाते आणि प्रशासनावर त्याचा ताण पडतो. प्रशासनाच्या गतीमानतेवर परिणाम होतो.

जिल्हा पातळीवर उच्च माध्यमिक (कनिष्ठ महाविद्यालय) शिक्षण विभाग स्वतंत्रपणे अस्तित्वात नसल्याने या विभागाची जबाबदारी शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचेकडेच असते. याकामी मदतीसाठी एक स्वतंत्र शिक्षण विस्ताराधिकारी (उ.मा) असतो. पंरतु

या जादा कार्यामुळे देखील शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्याची गती मंदावते. म्हणूनच माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकांच्या समस्या समजून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनाचा हा उद्देश असल्याने हे संशोधन होणे गरजेचे आहे.

या संशोधनकार्यात जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन अभ्यास करून त्यावर उपाय सूचविले जातील. जेणेकरून आपल्या अडचणी, मर्यादा लक्षात घेऊन प्रशासकांना आपले प्रशासन गतिमान करता येईल. प्रशासनात सुधारणा घडवून आणता येईल.

**१.५ संशोधनाची उद्दिष्ट्ये.**

संशोधनाची उद्दिष्ट्ये खालील प्रनाणे आहेत.

१. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासनाचे स्वरूप समजून घेणे.

२. लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या प्रशासकांना त्यांच्या कार्यात येणाऱ्या अडचणींचा (समस्यांचा) अभ्यास करणे.

३. लातूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांच्या प्रशासकांना येणाऱ्या समस्यांच्या कारणांचा शोध घेणे.

४. माध्यमिक शिक्षणाचे प्रशासन सुधारण्यासाठी उपाय सुचविणे.

**१.६ व्याप्ती व मर्यादा.**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने निवडलेल्या विषयाची व्याप्ती व मर्यादा खालील प्रकारे निश्चित केली आहे.

१. या संशोधनासाठी लातूर जिल्ह्या हे भौगोलिक क्षेत्र निवडले आहे.

२. या संशोधनात खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या माध्यमिक शाळांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

३. या संशोधनात लातूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील शिक्षणाधिकारी, उपशिक्षिणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तारधिकारी व लातूर जिल्ह्यातील मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

४. हे संशोधन आठवी ते दहावी व त्यांना जोडून असलेले पाचवी ते सातवी व

आकारावी व बारावी या वर्गांच्या प्रशासनापुरतेच मर्यादीत आहेत.

५. या संशोधनात स्वयंसेवी संस्थाद्वारे चालविल्या जाणाऱ्या अनुदानीत, विना-अनुदानीत, अंशतः अनुदानीत अशा ४७४ माध्यमिक शाळांचा विचार करण्यात आलेला आहे. जिल्हा परिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या (५०) व इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला नाही.

६. हे संशोधन २००३-०५ पर्यंतच मर्यादित आहे.

**१.७ प्रकरणांचे नियोजन.**

प्रस्तुत संशोधनाच्या प्रकरणांचे नियोजन खालील प्रमाणे केलेले आहे.

**प्रकरण पहिले.**

या प्रकरणात संशोधनाची पार्श्वभूमी, समस्येची निवड, समस्या विधान (यातील महत्त्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या), संशोधनाची उद्दिष्ट्ये, समस्येचे महत्त्व, गरज, व्याप्ती, मर्यादा, याबाबत माहिती नमूद करण्यात आली आहे.

**प्रकरण दुसरे.**

दुसऱ्या प्रकरणात संबंधित साहित्याचा अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनावर आधारित इतर संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. संबंधित संशोधनाचे समालोचन करण्यात आले आहे.

**प्रकरण तिसरे.**

तिसऱ्या प्रकरणात माध्यमिक शिक्षणाच्या जिल्हा पातळीवरील प्रशासनांचे तात्विक बाबीवर आधारीत स्पष्टीकरण करण्यात आले आहे. शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी आणि मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांच्या जबाबदाऱ्या, कर्तव्ये, अडचणी यावर स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**प्रकरण चौथे.**

या प्रकरणात संशोधनाची पूर्वतयारी, संशोधनाची साधने, प्रश्नावली, मुलाखतीसाठीची प्रश्नसूची, संशोधन कार्यपध्दती व निरीक्षणे याबाबतचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**प्रकरण पाचवे.**

या प्रकरणात संकलित माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण आणि विशदीकरण केले आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्ताराधिकारी व जिल्हातील मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांच्या मार्फत प्रश्नावलीद्वारा व मुलाखतीद्वारा प्राप्त झालेल्या

माहितीचे वर्गीकरण, विश्लेषण व विशदीकरण करण्यात आले आहे.

**प्रकरण सहावे.**

या प्रकरणात जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणविभगाचे शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक यांनी दिलेल्या माहितीच्या केलेल्या विशदीकरणाच्या सहाय्याने निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत. या निष्कर्षाच्या आधारे कांही शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. शेवटी पुढील संशोधनासाठी विषय सूचविण्यात आलेले आहेत.

## संदर्भ.

१. अकोलकर ग.वि., पाठणकर ना.वि.- "शालेय व्यवस्थापन आणि प्रशासन" निलकंठ प्रकाशन, पुणे.

२. दुनाखे अरविंद, पारसनिस हेमलता- "शैक्षणिक व्यवस्थापन व प्रशासन," नूतन प्रकाशन, पुणे.

३. पारसनीस न.रा. - "स्वांतत्र्योत्तर भारतीय शिक्षण", नूतन प्रकाशन, पुणे.

४. पाटील· लिला - "आजचे शिक्षण आजच्या समस्या", श्री विद्या प्रकाशन, पुणे.

५. ताम्हणकर एस्. डी. - "शैक्षणिक प्रकाशन व नियोजन," नूतन प्रकाशन, पुणे.